अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
MO.9860898564
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक - दिपक थोरात

उमापुर मध्ये चोरट्यांनी साई उमंग बँक फोडली

उमापूर (प्रतिनिधी)
गेवराई तालुक्यातील उमापूर येथील साई उमंग अर्बन मल्टीपर्पज निधी लिमीटेड बँक मूख्य शाखा उमापूर बस स्टॉप येथे आहे. (दि १० रोजी) मध्यरात्री आज्ञात चोरट्यांनी फोडली असल्याची घटना आज सकाळी उघडकीस समोर आली आहे. याबाबद् सविस्तर माहिती अशी की,उमापुर चौकीची हाकेच्या अंतरावर ही घटना घडली असल्याने नागरिकात संताप व्यक्त केला जात आहे. उमापूर येथे बस स्टॉप भरवस्तीत ही साई उमंग अर्बन मल्टीपर्पज निधी लिमीटेड बँक चोरट्यांना फोडण्यात यश आले आहे.

बीड (प्रतिनिधी) देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय.नरेद्रंजी मोदी यांच्या प्रेरणेने देशभर केंद्र सरकारच्या माध्यमातुन विकसित भारत संकल्प यात्रा सुरू आहे. ही यात्रा बीड तालुक्यातील देवीबाळगाव येथे आली असता त्या यात्रेला भेठ देण्यासाठी बीड लोकसभेच्या लोकप्रिय खा.डॉ.प्रितमताई मुंडे या जात असताना चौसाळा येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोठया जल्लोषात स्वागत करण्यात आले

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -८२ | सोमवार दि.११ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -82 | MONDAY DT.11 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

राज्यातील २४ जिल्ह्यात आतापर्यंत २२१६ कोटी अग्रीम पीकविमा मंजूर

१६९० कोटी रुपये वितरित, ६३४ कोटींचे वितरण सुरू - धनंजय मुंडे

नागपूर - राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामात पावसाचा खंड यासह विविध नैसर्गिक आपत्ती मुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले, त्याबाबत प्रधानमंत्री पीकविमा योजना अंतर्गत २४ जिल्ह्यातील सुमारे ५२ लाख शेतकऱ्यांना सुमारे २२१६ कोटी रुपये इतका अग्रीम पीकविमा २५% प्रमाणे मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी आज सकाळ पर्यंत १६९० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले असून सुमारव ६३४ कोटी रुपयांचे वितरण वेगाने सुरू आहे, अशी माहिती आज प्रश्नोत्तराच्या तासात कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादरम्यान दिली आहे.

२४ जिल्ह्यात स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून झालेल्या नुकसानीला अनुसरून संबंधित विमा कंपन्यांना २५ टक्के अग्रीम पिक विमा देण्याबाबत जिल्हा प्रशासनाच्या स्तरावरून अधिसूचना काढण्यात आल्या होत्या. मात्र त्या विरोधात काही कंपन्यांनी जिल्हा प्रशासन व विभागीय स्तरावरती अपिल केले होते. ते फेटाळून लावल्यानंतर काही पिक विमा कंपन्यांनी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे अपील केले होते. यादरम्यान राज्य शासनाच्या वतीने हवामान तज्ञ, कृषी विद्यापीठांमधील तज्ञ व्यक्तींचे सहकार्य घेऊन २१ दिवसांच्या पावसाच्या खंडाच्या नियमाला अनुसरून तसेच विविध तांत्रिक बाबींच्या दृष्टीने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान कंपन्यांच्या पुढे सिद्ध करून कंपन्यांना विमा देण्यास भाग पाडले. काही विमा कंपन्यांचे अपील अद्याप सुनावणी स्तरावर आहेत, ते अपील निकाली निघाल्यानंतर मंजूर पिकविम्याच्या रक्कमेत आणखी मोठी वाढ होणार आहे, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे. विविध जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना एक हजार रुपये पेक्षा कमी विमा रक्कम मिळाल्याच्या बाबी काही सदस्यांनी उपस्थित केल्या.

बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी 'या जगण्यावर

'शतदा प्रेम करावे' सांस्कृतिक कार्यक्रम

इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी नावे नोंदवावीत -डॉ.दिपाताई क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)
धकाधकीच्या जीवनात इच्छा असूनही तारुण्यात अनेकांच्या कला गुणांना वाव मिळत नाही. अशा ज्येष्ठ नागरिकांना वार्धक्यात कला सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी बीड शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात दि.२७ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता 'या जगण्यावर, शतदा प्रेम करावे' सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात सहभागी होण्यास इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी नावे नोंदवावीत, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी 'या जगण्यावर, शतदा प्रेम करावे...' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गीतगायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी, एकपात्री आदी सांस्कृतिक कार्यक्रम होतील. इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी प्रा.डॉ.दुष्यंता रामटेके - ९७६७३५५२९४, डॉ. संजय

पाटील देवळानकर - ९४२२२९५३१४, प्रा.मिलींद शिवणीकर - ९४२२९३०४९०४, प्रा.विजय राख - ९८३३३४५८०९, प्रा.रुक्मीनीकांत पांडव - ९४२१५१५२४४, डॉ.अनिता शिंदे - ७२७८३०५०५० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविले आहे.

पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव, वातावरणाचा हरभरा पिकाला फटका

अंबाजोगाई (प्रतिनिधी)
सध्याच्या ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच रात्र मोठी असल्यामुळे घाटेअळीचे पतंग मोठया प्रमाणावर अंडी घालतात. या सर्व बाबी घाटेअळीच्या प्रादुर्भावासाठी पोषक असल्यामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी घाटेअळीचा प्रादुर्भाव सुरू झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाटेअळी व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषी विभागाचे तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी केले आहे.चांगल्या पावसामुळे यंदा हरभऱ्याच्या क्षेत्रात वाढ झालेली आहे. मात्र, यावर आता घाटेअळीचा प्रादुर्भाव सुरु झाला आहे. ही कीड बहुभक्षी असून विशेषतः पीक फुलोरा आणि प्रामुख्याने घाटे अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, कळ्या व फुले कुरतडून खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या घाटे कुरतडून त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसून आतील दाणे खातात. साधारणतः एक अळी तीस ते चाळीस घाटयांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था

व प्रथम अवस्थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच उपाय योजना केल्यास कमी खर्चात किडींचे प्रभावी व्यवस्थापन होऊ शकते. मिडिया, यु ट्युब माध्यमातून कृषी विभागाचे तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी आवाहन केले. घाटेअळी व्यवस्थापनासाठी कोळपणी किंवा निंदणी करुन पीक तणविरहित ठेवावे. घाटेअळीच्या मोठ्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी जमिनीपासून १ मीटर उंचीवर लावावेत. कामगंध सापळयामध्ये ८ ते १० पतंग प्रति सापळा सतत २ ते ३ दिवस आढळल्यास किडनाशकाची फवारणी करावी. शेतामध्ये पक्षी बसण्यासाठी पिकाच्या किमान एक ते दोन फूट उंचीवर पक्षी थांबे हेक्टरी ५० ते ६० ठिकाणी उभारावेत. यामुळे पक्ष्यांना अळ्यांचे भक्षण करणे सोपे जाईल.

सुरक्षा साधने वापरा

शेतात कीडनाशकाचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना चष्मा, हातमोजे व तोंडावर मास्कचा व सुरक्षा किटचा वापर करावा. शेतकऱ्यांनी फवारणी करताना योग्य ती काळजी घ्यावी म्हणजे किटकनाशकचा शरीरावर प्रादुर्भाव होणार नाही.

सामाजिक उपक्रमांनी गोपीनाथ गडावर साजरी होणार लोकनेत्याची जयंती

पंकजाताईंचा सेवा संकल्प : १२ डिसेंबरला जन्मणाऱ्या बालकांच्या मातांचा सन्मान; रक्तदान, श्रमदान, अन्नदानही करणार

प्रतिनिधी । परळी
लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती येत्या १२ डिसेंबरला विविध सामाजिक सेवा उपक्रमांनी साजरी होणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे स्वतः या सर्व उपक्रमात सहभागी होणार आहेत. १२ डिसेंबरला जन्मणाऱ्या बालकांच्या मातांचा सन्मान तसेच रक्तदान, श्रमदान व अन्नदानही यादिवशी त्या करणार आहेत. दरम्यान, मुंडे साहेबांचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, गावागावात न्या, त्यांना समर्पित असा दिवस साजरा करा असं आवाहन त्यांनी राज्यभरातील कार्यकत्यांना केलं आहे.

यासंदर्भात पंकजाताईंनी एक व्हिडिओ संदेश त्यांच्या सोशल मीडियावर जारी केला आहे, त्या म्हणाल्या, यादिवशी मी काय करणार आहे? यांच्याबद्दल तुमच्या मनामध्ये खुप उत्सुकता असेल, मी आणि तुम्ही मिळून जर कार्यक्रम केला तर त्याच्यामध्ये सुसूत्रता येते. मी आपल्या सर्वांना माझा दिनक्रम सांगेल त्याप्रमाणे जर आपण आपला दिनक्रम त्या दिवशी जोडला तर आपल्या कार्यक्रमामध्ये साम्य नकीच बघायला मिळेल. त्यादिवशी सकाळी उठल्यानंतर मी सर्वप्रथम प्रभू वैद्यनाथाला अभिषेक करणार आहे. मुंडे साहेबांच्या विचारांच्या शतायुषी होण्यासाठी हे माझा प्रयत्न असेल. मुंडे साहेब शतायुषी व्हावे, आपले वडील दीर्घायुषी व्हावे असं प्रत्येक मुलीला वाटतं, आपला नेता मोठा व्हावा असं प्रत्येक कार्यकर्त्याला वाटतं, मुंडे साहेबांच्या बाबतीत तसं घडलं नाही, का तर मुंडे साहेबांचे विचार हे तर शतायुषी किमान व्हावे त्याही पेक्षा मोठे व्हावे, त्यासाठी मी ईश्वरला प्रार्थना करणार आहे. मुंडे साहेबांची जी विचारधारा

कार्यकर्त्यांना आवाहन मी तुम्हाला विनंती करते की, मुंडे साहेबांना समर्पित दिवस साजरा करताना अन्नदान, श्रमदान किंवा रक्तदान यापैकी कुठलं तरी दान आपण जरुर मुंढे साहेबांच्या नावाने करा, या सर्व उपक्रमांचा आपला व्हिडीओ, माहिती, बातम्या, फोटो हे सर्व आपण माझ्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून माझ्याशी हॅशटॅग गोपीनाथगड असं वापरुन शेअर करा ज्याच्यामुळे आपले सगळे कार्यक्रम माझ्यापर्यंत पोहोचतील आणि माझे सुध्दा कार्यक्रम आपल्यापर्यंत पोहोचतील असं पंकजाताईंनी म्हटलं आहे.

होती त्याप्रमाणे प्रार्थना केवळ वैद्यनाथाला करून भागणार नाही तर मी मस्जिदीत देखील जाणार आहे आणि तटूंतर मी बौध्द विहारात देखील जाणार आहे. मुंडे साहेब हे सर्व धर्माच्या, सर्व जातीच्या लोकांना हवहवसं वाटणारं असं नेतृत्व होतं, त्यामुळे मुंडे साहेबांची प्रार्थना देखील सर्व धर्माच्या, सर्व विचारांच्या लोकांच्या पध्दतीने झाली पाहिजे असा माझा आग्रह आहे. त्यामुळे मी अशी प्रार्थना त्यादिवशी करणार आहे. त्यानंतर गोपीनाथगडावर जावुन मी मुंडे साहेबांचे दर्शन घेणार आहे. आणि मुंडे साहेबांना जेवढे पदार्थ आवडत होते त्या पदार्थाचं ताट तयार करुन तो नैवेद्य मी समाधीच्या तिथे दाखवून मुंडे साहेबांचा वाढदिवस साजरा करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे.त्यानंतर सर्वात श्रेष्ठ असं कुठलं दान असेल तर ते रक्तदान आहे, एखाद्या व्यक्तीला त्याला हवं असणार्या गरजू रुग्णाला त्याच्या गटाचं रक्त नाही मिळालं तर फार मोठी अडचण निर्माण होते, ही अडचण ओळखुन आम्ही रक्तदानाचे शिबीर त्यादिवशी ठेवलं आहे. मी स्वतः यामध्ये रक्तदान करणार आहे. त्याचबरोबर अन्नदान आणि श्रमदान देखील करणार आहे. रक्तदान झाल्यानंतर गोपीनाथगडावर मी सकाळी ९ वाजता ते दुपारी २ वाजेपर्यंत थांबणार आहे, तिथे जे लोक दर्शनासाठी येतील त्यांच्याशी गाठीभेटी करणार आहे त्यानंतर परळीमध्ये जेवढे मुलं किंवा मुली जन्मणार आहेत

मनसेचे विविध मागण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

बीड ।प्रतिनिधी
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने धरणे आंदोलनकरण्यात आले. बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा व साईराम मल्टीस्टेट यांनी ठेवरदाराच्या ठेवी लुबाडण्याचा डाव घातला आहे. ठेवी परत न केल्यास अनेक ठेवीदार रस्त्यावर येतील. ज्ञानराधा व साईराम बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व संचालक यांचे पासपोर्ट जप्त करण्यात यावेत, तसेच बँकेच्या मंडळावर चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावेत. तसेच बीड जिल्ह्यातील ठेवीदारांचे पैसे तात्काळ देण्यात यावेत. मनसे आंदोलकांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे ज्ञानरावा मल्टिस्टेट व साईराम मल्टिस्टेट बँकेची उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावेत.

ज्ञानराधा मल्टिस्टेट व साईराम मल्टिस्टेट बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव तसेच संचालक यांचे पासपोर्ट जप्त करण्यात यावेत. दोन्ही संस्थेच्या संचालक मंडळासह अधिकारी, कर्मचारी यांच्या नावे असलेल्या प्रॉपर्टी विकण्यास प्रतिबंध घालावा. ज्ञानराधा मल्टिस्टेट व साईराम मल्टिस्टेट संचालकांनी

ठेवीदारांच्या संपुर्ण ठेवी तात्काळ देण्यात याव्यात. बीड जिल्ह्यात मल्टिस्टेट, अर्बन पतसंस्थेच्या परवानग्या देण्यात येऊ नये. तसेच चालु असलेल्या मल्टिस्टेट, अर्बन पतसंस्थेच्या उच्चस्तरीय चौकश्या करून त्यांच्या परवानग्या रद्द करण्यात याव्यात. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने धरणे आंदोलनात सहभागी मनसेचे नेते व पदाधिकारी त्यामध्ये वर्षा जगदाळे श्रीराम भदाडे सुमंत धस राजेंद्र मोटे, रेखा अंभोरे, आशा कुटे, सदाशिव बिडवे, श्रीकृष्ण गायके, कल्पना कवठेकर, सोमेश्वर कदम, लालासाहेब ढाकणे, आधी मनसेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुध दराच्या दरवाढीसाठी मसाला दुध वाटप लक्ष्यवेधी आंदोलन, दुग्ध उत्पादक दुहेरी आर्थिक संकटात :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- शेतीमालाला हमीभाव नसल्याने शेती परवडत नाही त्यामुळे संसाराची आर्थिक घडी बसवण्यासाठी अनेकांनी दुग्ध व्यावसायाला पसंती देत लाखो रुपये कर्ज काढून गाई म्हशी खरेदी करून दुधाचा जोडधंदा करत आहेत मात्र दुधाचे दर पडल्याने व पशुखाद्य,चारा यांचे दर वाढल्याने दुग्ध व्यवसाय परवडेनासा झाला आहे त्यामुळे आधिच दुष्काळाच्या झळा सोसत असलेला दुध उत्पादक दुहेरी आर्थिक संकटात सापडला असुन शासन अहवालानुसार गाईच्या दुधाला ४२ रूपये व म्हशींच्या दुधाला ६५ रुपये हमीभाव द्यावा या मागणीसह दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुध दरांमध्ये अनुदान द्यावे, पशुखाद्याचे दर कमी करावेत,पशुऔषधे जीएसटी मुक्त करावीत आणि भेसळयुक्त दूध विक्री प्रकरणी कठोर कारवाई करण्यात यावी या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या

नेतृत्वाखाली आज दि.११ डिसेंबर सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासनाच्या दुध उत्पादक शेतकरी धोरणाचा मसाला दुधाचे वाटप आंदोलन करत गांधीगिरी पद्धतीने शासनाच्या धोरणाचा निषेध करण्यात आला.निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील , मुख्यमंत्री, प्रधान सचिव यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात बीड शहरप्रमुख शेख युनुस शेख मुबीन, शेख मुस्ताक, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे,बाळसिंह परदेशी, मच्छिंद्र शिंदे आदि सहभागी होते.

भेसळयुक्त दुधाची बाजारात सर्रास विक्री होत असुन त्याचा दुधाचे दर वाढवुन मिळण्यास अडचण निर्माण होत आहे.भेसळयुक्त दुधामुळे महिला व बालकांमध्ये व्यंग वाढत असुन आरोग्यास अपायकारक असणा-या भेसळयुक्त दुध विक्री कडे शासन व प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असुन भेसळयुक्त दूध विक्री प्रकरणी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

धनगर समाजाचे ११ डिसेंबरला अधिवेशनावर धडकणार पिवळं वादळ

धनगर समाजाच्या विराट मोर्चास लाखोच्या संख्येने उपस्थित रहा– अमर वाघमोडे

बीड (प्रतिनिधी)

धनगर समाजाचा एसटी प्रवर्गातील मागणीसाठी मागील कित्येक वर्षापासून धनगर समाजाचा असणारा संघर्ष आता प्रत्यक्षात उतरताना दिसून येत आहे. धनगर समाज अजूनही आर्थिक बाबतीत मागासलेला आहे, धनगर समाजाची अनुसूचित जातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी, या मागणीसाठी नागपूर या ठिकाणी ११ डिसेंबर रोजी विधानभवनावर मोर्चा काढण्यात येणार आहे.. या मोर्चाला बीड जिल्ह्यातून हजारो समाज बांधवांनी

युवकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आव्हान धनगर समाजाचे युवा नेते अमर वाघमोडे यांनी केले

शिवसंग्राम प्रमुख ज्योतिताई विनायक मेटे आणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड शहराचे युवा नेते श्री नितिनजी जायभाये , वक्फ बोर्ड चे शहर काझी हाफिज मैनुद्दीन शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरातील मुस्लिम समाजातील मान्यवर लोकांसोबत अजमेर नगर येथे काल दुपारी महत्त्वपूर्ण बैठक झाली . बैठकीत महत्वपूर्ण विषयावर चर्चा झाली तसेच पुढील वाटचालीबद्दल महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

बीड शहरात केतय्या स्वामीं जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरात प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी बुरुड गल्ली मध्ये बुरुड समाजाचे आराध्य दैवत महान तपस्वी श्री.केतय्या स्वामी यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी प्रल्हाद तात्या वडतीले,अर्जुन भाऊ वडतीले, राजू वडतीले,लक्ष्मीकांत मोरे, सचिन वडतीले,प्रमोद वडतीले, अमोल वडतीले,प्रविण वडतीले,

प्रशांत वडतीले,रोहित वडतीले, अथर्व वडतीले,अनिल आडते,व बीड जिल्हा बुरुड समाज व मंडप कामगार युनियन संघटना पदाधिकारीयांनी उपस्थित राहून अभिवादन केले.

छावा क्रांतीवीर सेनेची बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्याची महत्त्वाची पदाधिकारी बैठक संपन्न

गेवराई /प्रतिनिधी

१ जानेवारी रोजी नाशिक येथे छावा क्रांतिवीर सेनेचा होणाऱ्या १० वर्धापन दिनाला मोठ्या संख्येने बीड जिल्ह्यातून पदाधिकारी उपस्थित राहतील. आज दिनांक ११/१२/२०२३ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष मा.करण भाऊ गायकर यांच्या उपस्थिती मध्ये बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्याच्या पदाधिकारी बैठक मोठया उत्साहात संपन्न झाली.यावेळी प्रदेश महासचिव शिवाजी राजे मोरे,शे.आ.प्रदेश अध्यक्ष पंकज जऱ्हाड,प्रदेश उपाध्यक्ष सुभाष गायकर, आयटीसी विभाग राज्य संपर्क प्रमुख वैभव दळवी,बीड जिल्हा अध्यक्ष राहुल चाळक,जालना जिल्हाप्रमुख राम पाटील गाडेकर नाशिक जिल्हा सरचिटणीस सागर शेजवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

यावेळी संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की गाव तिथे शाखा प्रत्येक घरामध्ये छावा क्रांतिवीर सेना पदाधिकारी आपल्याला तयार करायचा असून याकरता तुम्ही सर्वांनी कामाला लागायचे आहे. नाशिक येथे होणाऱ्या वर्धापन दिनाला मोठ्या संख्येने बीड जिल्ह्यातून छावा क्रांतिवीर सेनेचे मावळे आणायचे आहेत त्या संदर्भात काटेकोरपणे नियोजन करा बीड जिल्ह्यामध्ये

विविध प्रश्नांच्या संदर्भात संघटनेच्या वतीने आवाज उठविण्याचे काम येणाऱ्या काळात तुम्हाला सर्वांना करायचे आहे. जास्तीत जास्त संघटनेचे सभासद तयार करून संघटनेला बळकटी देण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहायचे आहे तुम्ही सर्व पदाधिकारी येणाऱ्या काळात संघटनेला गतवैभव प्राप्त करून द्या असा विश्वास आहे आज निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

यावेळी प्रदेश महासचिव शिवाजीराजे मोरे,शेतकरी आघाडी प्रदेशाध्यक्ष पंकज जराड पाटील,जिल्हाप्रमुख राहुल चाळक,प्रदेश उपाध्यक्ष सुभाष गायकर त्यांनीही उपस्थित पदाधिकाऱ्यांना संघटन वाढीसाठी संघटनेची ध्येय धोरण यासंदर्भात मार्गदर्शन केले. या मीटिंगसाठी चक्रधर शिंदे,मुक्ताराम मोटे,अविनाश हक्कदार,अविनाश थोरात,अनिल राठोड,सुदाम मोरे,जयराम काळे,इम्रान सौदागर,सावता काळे ,महेश पवार, सोमेश्वर नाटकर ,सुरज जैत,ओंकार देशमुख,सिद्धेश्वर मोटे,महेश पवार, पत्रकार संचार उमाप,गोकुळ मोटे,नर्सिंग पालेकर,अनंता बहिर,अक्षय मोरे,नारायण डोंगरे,तेजस साबळे,हे उपस्थित होते.तसेच अविनाश थोरात यांची गेवराई तालुका अध्यक्ष, मुखीद सय्यद,मुस्लिम आघाडी तालुका अध्यक्ष गेवराई, सोमेश्वर नाटककार उप तालुका प्रमुख गेवराई,सुरज जैत सर्कल प्रमुख तलवाडा,नारायण डोंगरे सर्कल प्रमुख मादळमोही पदी नियुक्ती करण्यात आल्या.

पोलीस स्टेशनचे नाव नेकनूर अवैध धंदयानेच झाले मशहुर?

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नेकनुर हे गाव म्हणजे मोठी बाजारपेठ, बरं या नेकनूर ला मराठीत निनगुर संबोधले जाते तर नेकनूर या नावाला तसा ईतिहास सुध्दा आहे. नेक म्हणजे चांगला , आणि नुर म्हणजे चेहरा .नेकनूर म्हणजे चांगला चेहरा असलेले ठिकाण किंवा गाव . हे नेकनूर नाव कदाचित निजामकालीन असावे? आपण आता ईतिहासात न जाता नेकनूर या चांगलं नाव असणार्या गावात सध्या नेकनूर नावाला बट्टा लावुन बदसुरत करणार्या घटनांचा आढावा या बातमी व्दारे मांडणार आहोत. नेकनूर हे मिनी तालुक्याच ठिकाण आहेच. या ठिकाणी हिंदू , मुस्लिम, आणि जवळजवळ अठरा पगड जातीचे नागरिक एका जिवाने एका दिलाने रहातात. परंतु याच नेकनूर हद्दीत सध्या चांगले कामं होण्यापेक्षा अवैध धंदयांनी उच्छाद मांडलेला दिसतो आहे. आणि त्यामुळे सध्या येथील नेकनूर पोलीस स्टेशन हे सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. नेकनुर पोलीस स्टेशन अंतर्गत तसे पाहीले तर मोठे सर्कल येते. परंतु या सर्वच सर्कलमध्ये सध्या चोरांचे,गुटखा सम्राटांचे,विनापरवाना दारु विक्रेत्यांच्ये राज सुरू झाले आहे, खाकीची ताकत या सर्वापुढे फिक्की पडत आहे असा आरोप या भागातील नागरीक करत आहेत. विशेष करुन या नेकनूर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणाऱ्या चौसाळा व लिंबागणेश सर्कल मध्ये राजरोजपणे अवैध धंदे सुरू असतानाही याकडे दुर्लक्ष होत असुन या परिसरात गुटख्याची खुलेआम पणे विक्री होत आहे . ठिकठिकाणी गुटखा उघडपणे विकला जात आहे रात्रभर गुटख्याची वाहतुक होत आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गावरती हॉटेल चालक हे विनापरवाना बनावट दारूची राजरोसपणे विक्री करताना दिसत आहेत .या हॉटेल चालकांना कुठलीच नियमावली मान्य नाही असे दिसते,कारण कायदयालाच आपल्याच ढाब्यावर बसवुन हे हॉटेल्स चालक रात्री उशीरा एक ते दोन वाजेपर्यंत हॉटेल उघडी ठेऊन या हॉटेलातुन बनावट दारू चा धंदा करत नागरीकांचे आरोग्य धोक्यात आणत आहेत अशी चर्चा या ठिकाणच्या सुज्ञ नागरीकातुन होत आहे. मध्यतंरीच चौसाळा येथील एका हॉटेलवरती वेश्या व्यवसाय उघडकीस आला होता. हे हॉटेल चौसाळा पोलीस चौकीच्या अगदी हाकेच्या अंतरावर होते.म्हणजे चौकीपासुन अगदी दोनशे फुटावर होते तरीही नेकनुर पोलीसांना याची कुठलीच भनक नव्हती?म्हणजे आश्चर्यच मानावे लागेल. नेकनुर या चांगला चेहरा असणारया नावाला सध्या हेच नेकनूर पोलीस स्टेशन नेकनूर चे नाव खराब करत आहेत अशी भावना या ठिकाणच्या नागरीकांनी बोलवुन दाखवली आहे. नेकनूर हद्दीमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन अवैध धंदयाचे माहेर म्हणून नेकनूर व बालाघाटचा परिसर झाल्याचे दिसुन येते .नेकनुर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये मागील काही दिवसांपासून घरफोडीचे, चोरी यांचे प्रमाण वाढले आहे. दिवसाढवळया गोरगरीबाचे घरे फोडुन चोरटे पसार झाले आहेत.सध्या बीड जिल्ह्यातील नागरिक दुष्काळी परिस्थितीत जगत असतांना एकीकडे नेकनूर हद्दीत चोरीचे प्रमाण वाढतच आहे हि बाब लक्षणीय अशीच आहे. याचा तपास लावण्याचे मोठे आव्हान नेकनुर पोलीसांसमोर आहे .परंतु गांधीजींच्या प्रतीकात्मक मांकडांसारखे सध्या नेकनूर पोलीस स्टेशनचे अधिकारी बसलेले दिसत आहेत. आम्हाला घडणारया गुन्हयांची ओरड ऐकु येत नाही त्यामुळे आमचे कान बंद आहेत. आम्ही यावर काहीच बोलणार नाहीत कारण आम्ही आमचे तोंड बंद केले आहे. आणि आम्ही सर्व काही दिसत असुन देखील डोळेझाक करु कारण आम्ही डोळे आपल्याच हातांनी झाकलेले आहेत ,अशीच अवस्था नेकनूर पोलीसांची सध्या झाली आहे. अशी गावागावातुन संतापपुर्ण चर्चा ऐकायला मिळत आहे.

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून आज बीड तालुक्यातील देवी बाभूळगाव येथील ग्रामस्थांशी संवाद साधला. केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ देशातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचावा, योजनांची जनजागृती व्हावी या संकल्पनेतून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी यांनी या अभियानाची सुरुवात केली आहे.आज या अभियानाच्या माध्यमातून आयुष्यमान भारत योजनेतील पात्र लाभार्थ्यांना हेल्थ कार्डचे वाटप ही केले.आपल्या जिल्ह्यातील अधिकाधिक लोकांपर्यंत सदरील अभियान पोहोचावे, योजनांचा प्रसार व्हावा याकरिता जवाबदारीने कार्यरत राहण्याच्या सूचना ही प्रशासनाला दिल्या.



मनोज जरांगे पाटील यांच्या अंबाजोगाई येथील सभेसाठी वंचित बहुजन आघाडी कडून मोफत रुग्णवाहिका सेवा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

आज दि. ११ डिसेंबर २०२३ रोजी आंबा साखर कारखाना या ठिकाणी संघर्ष योद्धा मा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या सभेच्या स्थानी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मोफत रुग्णवाहिका सेवा पुरविण्यात येत आहे.शैलेश कांबळे वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हाध्यक्ष (पूर्व).

दरवर्षीप्रमाणे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती साजरी करताना व तसेच मौजे कोठारबन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करताना सोमनाथ भाऊ बडे ज्येष्ठ नेते भाजपा ईश्वर तांबडे युवा मोर्चा ता. अशोक बापू मुंडे(सरपंच) भास्कर जी मुंडे(उपसरपंच) सुधाकर जी मुंडे सुभाष डोंगरे तुकाराम डोंगरे केशव भाऊ मुंडे तुकाराम मुंडे सुभाष मुंडे उमेश जिजा मुंडे व आम्ही सर्वजण.

उमापूरमध्ये गूटखा माफिया विरुद्ध अन्न व औषध प्रशासनाची कार्यवाई

पंदरा हजाराचा मुद्देमाल जप्त;दोघाविरूद्ध गून्हा

उमापूर ।प्रतिनिधी

उमापुर परिसरात दोन वेगवेगळ्या गोळ्या बिस्कीटाच्या दूकानात अन्न व औषध प्रशासनाच्या वतिने तपासणी करण्यात आली तसेच या दोन्ही दूकानात तंबाखूजन्य गूटखा मिळून आला तसेच चंकलाबा पोलिसांत या प्रकरणी दोघाविरूद्ध गून्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,आज दूपारी उमापूर परिसरात अन्न व औषध प्रशासनाचे भरारी पथक गस्तीवर असतांना त्यांना खात्रीलायक सुत्रांनी. शेख ईम्राण ईसामियाँ व समिर ईस्माईल शेख हे दोनव्यक्ती आपल्या दूकानात अनाधीकृत कायद्यानुसार कर्करोगजन्य तंबाखू व गूटखा हे विक्रीकरत असल्याच्या माहिती वरूण सदरच्या दोन्ही दूकानात बीड येथील. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकांने छापा मारला व यामध्ये,गोवा,बाबा,हिरा,राजनिवास यासारख्या पंदरा हजार रूपयाचा मुद्देमाल सापडला हा गूटखा कुठून

अशी विचारणा केली असता यादोन्ही आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे देऊन त्याठिकाणाहून पलायन केले,तसेच या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाचे महेंद्र गायकवाड यांच्या फिर्यादीवरून चकलांबा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पुढील तपास उपनिरीक्षक तांगडे हे करत आहेत.

बीड जिल्ह्यातील युवकांनी आणि नागरिकांनी रक्तदान करण्यासाठी पुढे याने गरजेचे -गोकुळ सानप, रायमोहाकर....!

शिरुरकासार ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नागरिकांनी व युवकांनी पुढे येणे गरजेचे आहे बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसापासुन रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असुन रक्ताची टंचाई जाणवत आहे एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे तीन लोकांचा जीव वाचू शकतो म्हणुन सध्याची परिस्थिती पाहाता स्वयंस्फुर्तीने सुजाण युवक नागरिकांनी रक्तदान करत सामाजिक दायित्व दाखवावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते गोकुळ सानप,रायमोहाकर यांनी याप्रसंगी केले आहे.

सतीश रावसाहेब राऊत यांची निवड धाडस सामाजिक संघटना बीड युवा उपतालुका पदी निवड करण्यात आली प्रशांत भैय्या आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली निवड पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा शुभेच्छुक बीड धाडस युवा तालुका अध्यक्ष प्रशांत भैय्या आव्हाड.

(प्रतिनिधी)बीड जिल्ह्यातील नागरिकांनी व युवकांनी पुढे येणे गरजेचे आहे बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसापासुन रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असुन रक्ताची टंचाई जाणवत आहे एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे तीन लोकांचा जीव वाचू शकतो म्हणुन सध्याची परिस्थिती पाहाता स्वयंस्फुर्तीने सुजाण युवक नागरिकांनी रक्तदान करत सामाजिक दायित्व दाखवावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अशोकराव ढोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे आव्हान केले आहे.

दुष्काळ भागातील शेतकर्यांचे पाच लाखा पर्यंत सरसकट कर्जमाफी करा -विश्वनाथ शरणांगत

बीड (प्रतिनिधी)

सध्या मराठवाडयात शेतकरी हा हाताश आहे. प्रत्येक वर्षी आतिवृष्टीच्या नुकसानी तर पाऊस न पडलेल्या मुळे आसे कोणत्या ना कोणत्या कारणानी शेतकरी राजा आडचणीत सापडत आहे.दुसरे आसे की सरकार च्या कांही तृटींने शेतकरी हा बाँकेचा थकबाकिदार झाला या थकबाकि होण्याला सरकारच जिमे दार आहे.

याचे कारण की या आगोदर सरकारने कर्जमाफीची घोषणा केली.परंतु कांही शेतकर्यांचे कर्ज माफ झाले नाही.पुन्हा कर्जमाफी करू आश्वासन द्यावी नेते मंडळी देत आसताना त्यांच्या या बोलण्याने शेतकरी वर्ग बॉकेचा थकबाकि दार होत गेल्याने शेवटी शेतकरी कर्जबाजारी होत गेला बाँकेवाल्यांनी एक लाखाच्या आतमध्ये कर्ज दिलेले तेच कर्ज तीन पाच लाखापर्यंत आकडा बॉकेवाल्यानी केलेल आहे.त्यामूळे .सरकारणे सदरील बाब लक्षात घेवून

शेतकरे कडील सरस गट कर्ज पाच लाखा पर्यंत माफ करावे. आशी मागणी कीर्ती वंचित बहूजन आघाडी संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ शरणागत यांनी महाराष्ट्र सरकारकडे केली आहे .

सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र इंगळे यांना जिवे मारण्याची धमकी

नरेंद्र इंगळे हे एक समाज कार्यकर्ता असून

एका वर्षापूर्वी नरेंद्र इंगळे यांची चूक नसताना चंदन दयाराम घटे या व्यक्तीने दि. १२ जुलै २०२२ रोजी यांना जातीवादी शिवीगाळ करून काठीने मारहाण केली व तेव्हा नरेंद्र इंगळे हे बाळापूर पोलीस स्टेशन ला तक्रार करायला गेले असता तेव्हा त्यांचं मेडिकल पण झालेलं होत परंतु गावातील प्रतिष्ठित व्यक्तीने मला समजावून सांगितले कि केस करू नको व चंदन घटे त्यानां माझ्या पाया पडून माफी मागायला लावली.या गोष्टीची खुन्नस मनामध्ये धरून तो व्यक्ती नरेंद्र इंगळे यांना जातीवाचक शिवीगाळ करून म्हणजे तू ढेडल्या मला पोलीस स्टेशनला माफी मागायला लावली आता तुला तर जिवंत सोडणार नाही. माझं एक एकर गेलं तरी चालेल आणि तुला खोट्या केसमध्ये फसवणार व माझे नावही कुठेही येणारं नाही कारण चंदन घटे हा व्यक्ती नेहमी बिमारीचे नाटक करून खोटे मेडिकल रिपोर्ट बनून आणतो. आणि

लोकांना सांगतो की मी बिमार आहे याच गोष्टीचा फायदा घेऊन तो या प्रकरणातून निघण्याचा पर्यन्त करत आहे. आणि तो हे सगळं नरेंद्र इंगळे यांना बोलून दाखवलं आहे की माझ्या जवळ पैसा आहे आणि पोलीस स्टेशनला माझी खूप ओळखी आहे. ह्या प्रकरणामुळे नरेंद्र इंगळे यांना मानसिक त्रास देत असल्याने ते ६ ते ७ महीने गावा बाहेर राहीले. काही महिन्यानंतर गावात आल्यावरही चंदन घटे इसम पुन्हा त्याच प्रकारे त्रास देत होता २० जुलै २०२३ ला पारस पोलीस चौकी ला लेखी तक्रार मागे घेतली तिसऱ्यादा चंदन घटे हे तिथेही हजर राहिले नाही त्यांनी बिमारीचे नाटक केल आणि चंदन घटे यांची पत्नी पारस पोलीस स्टेशन ला आल्या होत्या. आणि त्यांनी आपल्या पती विषयी हमी दिली की आता यापुढे माझ्या पती कडून कुठलाही त्रास नरेंद्र इंगळे यांना होणार नाही. त्यामुळे इंगळे यांनी केस परत मागे घेतली परतु त्यानंतर हा विषय अजुन गंभीर झाला. नरेंद्र इंगळे हे गल्लीतून जाता येतांना त्यांना बघून जातीय शिवीगाळ करणं व जिवंत मारण्याच्या धमक्या देणे हा प्रकार चंदन घटे या व्यक्तीकडून सुरूच आहे. या गोष्टीमुळे नरेंद्र इंगळे पूर्ण पणे वैतागले आहे त्यांना कुठलेही काम करता येत नसल्यामुळे सतत ह्या सगळ्या गोष्टीचा त्रास होत असल्यामुळे त्यांनी आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला होता परंतु त्यांनी स्वतःला सावरले व विचार केला मी मेलो तर त्या व्यक्तीला चांगलंच होईल पण नुकसान स्वतःच आणि दुःख घरच्यांना होईल.

जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थाअंतर्गत भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन- रणवीर पंडित

बॅडमिंटन आणि बुद्धीबळ स्पर्धेचा यावर्षी क्रीडा महोत्सवात समावेश

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांच्या क्रिडा विषयक कलागुणांना वाव देण्यासाठी मागिल वर्षीप्रमाणे यावर्षीही भव्य क्रीडा महोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धीबळ आणि थलॅटिक स्पर्धा घेण्यात येणार आहेत. दिनांक ९ डिसेंबर ते १६ डिसेंबर या दरम्यान गेवराई तालुक्यातील जयभवानी विद्यालय गढी, शिवशारदा पब्लीक स्कुल शिवाजीनगर, आयटीआय मैदान गेवराई आणि माध्यमिक विद्यालय रामपुरी येथे या स्पर्धा होणार आहेत अशी माहिती शारदा क्रीडा अकॅडमीचे संचालक रणवीर पंडित यांनी दिली.

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत होणा-या या भव्य क्रीडा महोत्सव २०२३ ची माहिती देताना रणवीर पंडित पुढे म्हणाले की, गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागात क्रिडारुची असणाऱ्यांची संख्या जास्त असून क्रिडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी आणि शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या क्रिडा महोत्सवाचे आयोजन २०२२ पासून करण्यात येत आहे. मागील वर्षी क्रिडा महोत्सवाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. यातून विविध क्रिडा प्रकारात अनेक विद्यार्थी नावारुपाला आले. यावर्षीही क्रिडा महोत्सव २०२३ चे व्यापक प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या आठरा शाळेतील विद्यार्थी या क्रिडा महोत्सवात विविध गटामध्ये कबड्डी, खो-खो, व्हालीबॉल

आणि थलॅटिक स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यावर्षी बॅडमिंटन आणि बुद्धीबळ स्पर्धेचा समावेश करण्यात आला आहे.

स्पर्धेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. शनिवार दिनांक ९ डिसेंबर रोजी गेवराई येथील शारदा अकॅडमी मैदान, शारदा विद्यामंदीर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. मुलींच्या गटात कबड्डी स्पर्धा आणि बॅडमिंटन स्पर्धांनी महोत्सवास प्रारंभ होणार आहे. दिनांक १० डिसेंबर रोजी याच मैदानावर मुलांच्या गटात कबड्डी स्पर्धा रंगणार आहेत. दिनांक ११ डिसेंबर रोजी माध्यमिक विद्यालय रामपुरी येथे मुले आणि मुलांच्या गटात व्हॉलीबॉल स्पर्धा होणार आहेत. दिनांक १२ डिसेंबर रोजी जयभवानी हायस्कूल गढी येथे मुलींच्या गटात खो खो स्पर्धा होणार आहेत. दिनांक १३ डिसेंबर रोजी जयभवानी हायस्कूल गढी येथेच मुलांच्या गटात खो खो स्पर्धा आणि बुद्धीबळ स्पर्धा होणार आहेत. दिनांक १४ डिसेंबर रोजी शिवशारदा पब्लीक स्कुल शिवाजीनगर येथे मुलींच्या तर १५ डिसेंबर रोजी मुलांच्या गटात थलेटिक्स स्पर्धा रंगणार आहेत. दिनांक १६ डिसेंबर रोजी शिवशारदा पब्लीक स्कूल येथेच अंतीम सामना होऊन या क्रिडा महोत्सवाचा समारोप होणार असून दररोज सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत या स्पर्धा होणार आहेत तसेच अंतिम सामना सायंकाळी चार ते रात्री नऊ या वेळेत होणार आहे अशी माहिती रणवीर पंडित यांनी दिली. क्रिडा महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली असून क्रिडारसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही रणविर पंडित यांनी केले आहे.

बीड- सायं.दै.सिटीझनचे उपसंपादक शेख तालेब यांच्या वडिल शेख अब्दुल बासीद यांचे नुकतचे दु:खद निधन झाले. या प्रसंगी ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देवून शेख कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी संपादक मोहम्मद अबुबकर, नवनाथ काशीद, सुशांत सरडकर,सुहास पाटील, अमजद पठान, शेख अखिल,इम्रान जागिरदार,शेख अझहर, सलमान आली मनोज जाधव , उपस्थित होते.

राष्ट्रीय ऍग्रो आयडॉल पुरस्कारनी बाबु कोकाट सन्मानित

बीड (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील त्रिंबक (बाबु) कोकाट यांना राष्ट्रीय ऍग्रो आयडॉल पुरस्कार २०२३ या पुरस्काराने दि.६ डिसेंबर रोजी नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथे मोठ्या कृषी सोहळा मध्ये पुरस्कार वितरण संपन्न झाला.या वेळी मा.संजीव सोनवणे,कुलगुरू यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,मा.मोहन वाघ,विभागीय कृषी सहसंचालक नाशिक, माननीय श्री.आबासाहेब मोरे,श्री स्वामी समर्थ कृषी विकास चारिटेबल ट्रस्ट नाशिक,श्री.भूषण निकम, चेअरमन अग्रो केअर ग्रूप ऑफ कंपनीज, व तसेच कृषि विभाग मधील उच्चपदस्थ

अधिकारी तसेच शेतकरी बंधू यांच्या उपस्थिती त मोठा सन्मान सोहळा पार पडला.

कृषि विभाग मधील अधिकारी व प्रमुख मान्यवरांचा हस्ते या बाबु कोकाट यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, मेडल व विशेष सत्कार समारंभ मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो ठाकर आडगाव येथील संध्या मल्टी सर्व्हिसेस चे संचालक व युवा शेतकरी मित्र बाबु कोकाट यांनी संध्या मल्टी सर्व्हिसेस च्या माध्यमातून गेल्या चार ते पाच वर्षांत शेतकरी हिताचे प्रामाणिक पणे कामे केल्यामुळे त्यांना या कामाची पावती म्हणून हा राष्ट्रीय ऍग्रो आयडॉल पुरस्कार २०२३ मिळाला बाबु कोकाट यांना हा पुरस्कारनी सन्मान झाल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्ष होत आहे.मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला याचे सर्व श्रेय मी शेतकरी बंधू व बीड (आत्मा) बी.टी.एम.जुबेर पठाण सर गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री.अभय वडकुते सर, जातेगाव मंडळ कृषि अधिकारी अश्विनी मस्के मॅडम, ठा.आडगाव चे कृषि सहाय्यक श्री सुहास शिंदे, ठा, आडगाव,बेलगुलवाडी, कोलते वाडी,गोळेगाव मधील सर्व शेतकरी या सर्वांच्या सहकार्यामुळे मला हा पुरस्कार मिळाला परत एकदा सर्व शेतकरी बंधू यांचे मी आभार मानतो.

त्रिंबक (बाबु)कोकाट

कुर्डुवाडी ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञाची कायम स्वरूपी नेमणूक करावी- प्रतीक्षा गोफणे

बीड (प्रतिनिधी)

कुर्डुवाडी ग्रामीण रूग्णालयात अनेक वर्षापासून स्त्रीरोग तज्ज्ञाची नेमणूक झालेली नाही. कुर्डुवाडी शहर हे रेल्वेचे जंक्शन असून शहराबरोबरच नजीकच्या बारा- तेरा गावांसह रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांनाही अनेकवेळा स्त्रीविषयक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यावेळी बाहेरून खासगी डॉक्टर पाचारण करावा लागतो. तरी कुर्डुवाडी ग्रामीण रूग्णालयात कायमस्वरूपी स्त्रीरोग तज्ज्ञांची नेमणूक करावी यासाठी भाजपच्या महिला आघाडी शहराध्यक्ष प्रतीक्षा गोफणे यांनी सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना दिले आहे.

कुर्डुवाडी शहर हे साधारण ३५००० लोकसंख्येचे गाव असून नजीकच्या १२ ते १३ गावांचा कुर्डुवाडी शहराशी संपर्क असतो. ग्रामीण रुग्णालय कुर्डुवाडी येथे गेली अनेकवर्षापासून स्त्री रोग तज्ज्ञाची नेमणूक केलेली नाही. त्यामुळे सदर गावातील गोर गरीब स्त्रियांची गैर सोय होत असून त्यांना

आरोग्य सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात जावे लागते परंतू खासगी दवाखान्यावा खर्च अशा गोर गरीब कुटुंबाला न परवडणारा असतो. त्यामुळे आपण या विषयाकडे विषयाकडे वैयक्तिक लक्ष देऊन लवकरात लवकर कुर्डुवाडी ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञांची कायमस्वरुपी नेमणूक करुन महिलांची होणारी गैर सोय दूर करावी अशा आशयाचे निवेदन भाजपच्या महिला आघाडी शहराध्यक्ष प्रतीक्षा गोफणे यांनी सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांना दिले आहे.सदर निवेदन शिवसेना सोलापुर जिल्हा समन्वयक प्रा.शिवाजी सावंत यांनी स्वीकारून गोफणे यांची फोनवरून मंत्री तानाजी सावंत यांच्याशी बोलणे करुन दिले त्यानंतर मंत्री सावंत यांनी एका आठवड्यात नियुक्ती करण्याचे आश्वासन प्रतीक्षा गोफणे यांना दिले.यावेळी भारतीय जनता पार्टी युवा मंचचे तालुकाध्यक्ष उमेश पाटील, कुर्डुवाडी शहर शिवसेनेचे शहराध्यक्ष समाधान दास ,माढा शहराध्यक्ष भारतीय जनता पार्टी शुभांगी मोहोळ आदी उपस्थित होते.

ॲट्रॉसिटी व अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याच्या प्रकारणातील

मुख्य आरोपीस मा. सत्र न्यायालाने अटकपूर्व जामीन मंजूर केला

तलवाडा (प्रतिनिधी)

अल्पवयीन मुलगी अनुसूचित जाती मधील आहे ह माहित असतांना सुरुवातीला तिच्या अल्पवयाचा फायदा घेऊन तिला पाण्यातून झोपेची गोळी देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले तसेच तिचे फोटो काढून तिला वारंवार बदनामी करण्याची धमकी देऊन तिच्यावर बलात्कार केल्याच्या प्रकारणातील मुख्य आरोपीस मा. सत्र न्यायालाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.

या बाबत सविस्तर माहिती अशी कि,दिनांक २०/११/२०२३ रोजी ता.आष्टी येथील एका महिलेने अंभोरा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली की,फिर्यादी ही अल्पवयीन असतांना आरोपी नामे सागर सहदेव रक्कटे रा. लोणी सय्यदमीर ता. आष्टी याने तिला त्याच्या घरी बोलून घेतले व तिला पाण्यातून झोपेची गोळी देऊन तिला बेशुद्ध करून तिच्या संमती शिवाय तिच्यासोबत लैंगिक संबंध ठेवले व तिचे फोटो मोबाईलमध्ये काढले व सदर काढलेल्या फोटो आधारे तो तिला सन २०१८ पासून तिची बदनामी करण्याची धमकी देऊन तिच्यावर सतत बलात्कार करत होता. सन २०२२ मध्ये फिर्यादी हिचे लग्न झाल्यानंतर सुद्धा आरोपी हा तिला त्रास देत होता व त्याने फिर्यादी हिच्या पतीला तिचे फोटो इंस्टाग्राम पाठवून तिची बदनामी केली. फिर्यादी हिने पतीला त्याबाबत सांगितले. तसेच ती अनुसूचित जातीमधील मुलगी आहे ह माहित असतांना सुरुवातीला तिच्या अल्पवयाचा फायदा घेऊन तिला पाण्यातून झोपेची गोळी देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले तसेच तिचे फोटो काढून तिला वारंवार बदनामी करण्याची धमकी देऊन तिच्यावर सतत बलात्कार अशी फिर्यादी दिली.सदर फिर्यादी वरून आरोपी सागर याच्या विरुद्ध कलम ३७६,३७६(२)(प),३७६(२)(क्ष)५०६ भा. द. वि. आणि कलम ४,६,१२ पॉस्को कायदा व कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला.सदर आरोपी सागर याचा अटकपूर्व जामीन अर्ज मा सत्र न्यायालयात ड. सचिन आबूज यांनी दाखल केला. सदर अर्जावर फिर्यादी, पोलीस यांचे म्हणणे व युक्तीवाद मा. न्यायालयात झाला. आरोपीचे वकील ड. सचिन आबूज यांनी घेतलेला बचाव आणि केलेला युक्तीवाद व तपासात आलेला पुरावा पाहून मा. सत्र न्यायाधीश नं.१,बीड यांनी आरोपी सागर यास अटकपूर्व जामीन मंजूर केला.

सदर प्रकरणात आरोपी सागर याच्या याच्यावतीने बीड येथील ड. सचिन आबूज काम पहिले. त्यांना आष्टी येथील जेष्ठ वकील पारखे यांनी मार्गदर्शन व अभिजीत गलधर आणि हर्षल बहीर यांनी सहकार्य केले.

श्री दिनकर महाराज शास्त्री बाभुळगावकर, डेहरादून,हरिद्वार, उत्तराखंड यांची (गादीवर) नेमणूक सोहळा संपन्न

(बीड)

इंद्रप्रस्थान अध्यात्मिक ज्ञानविकास आश्रम चॅरिटेबल ट्रस्ट बीड या ट्रस्टचे देहरादून हरिद्वार (बद्रीनाथ) या ठिकाणी नवीन आश्रम तयार केले असून गादीवर डेहराडदून, हरिद्वार, उत्तराखंड येथील श्री दिनकर महाराज शास्त्री यांची यांची कायमस्वरूपी नेमणूक इंद्रप्रस्थान आध्यात्मिक ज्ञान विकास आश्रम चारिटेबल ट्रस्ट बीड तर्फे ट्रस्टचे प्रमुख भारत महाराज कुरणकर यांनी केली.या आश्रमाच्या माध्यमातून जल, जमीन, जंगल, जनावरे व जनता या घटकांवर.काम करण्याबरोबरच अखंड अन्नछत्र सुद्धा करणे हजार भक्ती निवास तयार करणे गोशाळा व वृद्धाश्रम निर्माण करणे, तसेच संस्कार केंद्र तयार करून मानव जातीच्या विकासासाठी कौशल्य विकास केंद्र निर्माण करणे, व समाज उन्हातून मुक्त होण्यासाठीचा प्रयत्न या आश्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे .याद्वारे लक्ष्मीनारायण मंदिर हरिद्वार येथे निर्माण करून महाराष्ट्रामध्ये तिर्थापुरी तालुका अंबड पैठण नगरी,आळंदी आदी ठिकाणी लक्ष्मीनारायण मंदिर

व गोशाळा सह वृद्धाश्रम चालू करणे नियोजित आहे.याप्रसंगी ट्रस्टच्या माध्यमातून जनसेवेचे प्रयत्न अखंडपणे चालू ठेवणार असून येणाऱ्या काळात जास्त मार्फत अनेक प्रकारची समाजसेवेची कामे करणार असल्याचे नवनिर्वाचित आश्रम प्रमुख श्री दिनकर महाराज शास्त्री बाभूळ गावकर डेहराडून हरिद्वार उत्तराखंड यांनी आशीर्वादरुपी मार्गदर्शनातून. आपले मत मांडले या कार्यक्रमासाठी उपस्थित इंद्रप्रस्थान अध्यात्मिक ज्ञान विकास आश्रम चॅरिटेबल ट्रस्ट भारत कुरणकर, रामेश्वर कुरणकर, व सौ,सुमन कुरणकर.सह.प्रमुख उपस्थिती डॉ. जमुना प्रसाद रैवाणी साहेब (हरिद्वार).ड, चव्हाण साहेब,ड, कदम साहेब, सिए.नितीन राजवन साहेब, पी एस आय टीपरसे साहेब, प्रा.पाटील साहेब, प्रा.आनंद ढाकणे , फहीम इनामदार,पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष - रविंद्र शिनगारे , धीरज कोळी , वसंत नाना बडे.गोवर्धन केरूळकर, जनार्धन महाराज तीळपणे, अण्णासाहेब काशीद, बाबासाहेब पानवे, हनुमंत सर पानवे, अशोकराव शिनगारे (मामा) सुभाष शिंदे ,सचिन उबाळे, सौ,ढाकणे मनीषा सौ, कलावती शिनगारे, सौ,साधना कापरे, सौ,नंदा काटे, सौ,शामला उबाळे, सौ ,दीपा शिनगारे, विजय शिनगारे ,अमोल खाडे, सत्येंद्र पाटील.इत्यादींची उपस्थितीत ट्रस्टच्या वतीने नेमणूक सोहळा संपन्न झाला.

बीड नगर परिषदेचा मनमानी कारभार आता थांबणार शासनाने नागरिकांच्या मूलभूत अत्यावश्यक प्रमाणपत्रांचे निर्गमित करण्याची

कालमर्यादा शासनाने निश्चित केली-शेख निजाम

बीड (प्रतिनिधी)

लोकांची रोजची सरकारी कामे व राजकीय हस्तक्षेपा मुळे सहा महिने लटकुन ठेवण्यास भाग पडायचे राजकीय फायदा होईल म्हणून सर्वसामान्य नागरिकांना नगरपरिषदेमध्ये प्रत्येक कामासाठी नाहक मोठा वेळ लागत होता त्यामध्ये अनेक मूलभूत अत्यावश्यक प्रमाणपत्र रोजच्या जीवनामध्ये शिक्षणामध्ये व्यापारामध्ये आवश्यक होत्या असे प्रमाणपत्र संबंधित महानगरपालिका नगरपालिका किंवा ग्रामपंचायत या कार्यालयाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक होते परंतु नगर परिषदेमध्ये सदरील प्रमाणपत्र निर्गमित करणे बाबत कोणतेही काल मर्यादा निश्चित नव्हती त्यामुळे साधे जन्म प्रमाणपत्र मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना एक एक महिना चकरा मारून वेळ लागत होता व बांधकाम परवाना व दाखले मिळवण्यासाठी कधी कधी एक एक वर्ष तर कधी कधी दोन दोन वर्षापर्यंत लोकांना सर्व कागदपत्रे देऊन वाट बघावी लागत होती बीड नगरपरिषदेमधील तर जो लोक शिष्टमंडळ घेऊन येत नाहीत तो पर्यंत नागरिकांच्या पायाभूत सुविधां व समस्या सुटत नव्हतेच अधिकारी व कर्मचारी सत्ताधाऱ्यांच्या इशाऱ्यावर काम करीत होते एखाद्या प्रकरणांमध्ये जाणून-बोलून त्रास देण्याच्या उद्देशाने सदरील प्रमाणपत्र बांधकाम परवाना ना हरकत प्रमाणपत्र बांधकाम पूर्तता प्रमाणपत्र गुंठेवारी यासारख्या अनेक आवश्यक असणाऱ्या नगर परिषदे कडून मिळणाऱ्या सुविधा ह्या नियमानुसार विहित वेळेत दिल्या जात नव्हत्या सदरील प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार सुद्धा झालेले अनेकदा आपल्यासमोर आलेले आहेत या सर्व प्रकरणांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने लोकांना या होणाऱ्या त्रासाबाबत ठोस कार्यवाही व्हावी यासंबंधी प्रयत्न पाठपुरावा सुरू होता त्यानुसार शासनाने या संदर्भात याबाबत आदेश काढलेले असून प्रत्येक नगर परिषदेमधील काम व प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कालमर्यादा निश्चित केलेली असून सदरील काम विहित मुदतीत न केल्यास त्या संबंधी संबंधित कार्यालयातील वरिष्ठाकडे अपील करण्याची मुभा देण्यात आलेली आहे त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून त्यांची मुक्तता होणार असून आता शिष्टमंडल फारमोला व मि सांगेन त्याचीच कामे होतील ही बाब आता इतिहास जमा होइल अनेक गैरप्रकार यामुळे थांबणार आहे व या उपर ही बीड नगर परिषदेत कालमर्यादेत सर्वसामान्य लोकांच्या आरोग्यविषयक , बांधकाम, नगररचना, स्वच्छता विभागाचे कामे न केल्यास शिवसेना पध्दती ने जाब विचारणार व लोकांनी ही काही अडी अडचणी कींवा त्रास होत असेल तर शिवसेने च्या कार्यालयास संपर्क साधावा असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड शहर प्रमुख शेख निजाम यांनी आपल्या दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

तालुका कृषी अधिकारी गंडे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

कृषी अधिकाऱ्यांचा गाव शिवाराची पाहणी दौरा चौसाळा मंडळ कार्यक्षेत्रामध्ये पार पडला

बीड (प्रतिनिधी)

तालुका कृषी अधिकारी बाबासाहेब गंडे यांनी आज चौसाळा,लिंबागणेश ,बोरखेड महसूल मंडळात आज प्रत्यक्ष पाहणी दौरा पार पडला.सध्या हवामानात बदल व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

चौसाळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे रब्बी हंगामातील हरभरा पिकावर पाने खाणाऱ्या हिरव्या घाटे अळीचा प्रादुर्भाव झाला असून, त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. अनेक कीटकनाशकांची फवारे करूनही आळीचा प्रादुर्भाव कमी होत नसल्याने शेतकरी पुन्हा संकटात सापडले आहेत.हरभरा पिकावर घाटे अळीचा तर ज्वारीवर लष्करी अळींचा प्रादूर्भाव सुरू झाला आहे.यावर उपाय योजना म्हणून तालूका कृषी अधिकारी बाबासाहेब गंडे यांनी चौसाळा, लिंबागणेश,बोरखेड महसूल मंडळात प्रत्येक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग उपस्थित होते.तसेच नंदू आबा जोगदंड यांच्या पपई लागवड शेतात कृषी अधिकारी यांनी भेट देऊन फळबाग लागवड संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी तालूका कृषी अधिकारी गंडे साहेब मंडळ कृषी अधिकारी चौसाळा मिटकरी एस.बी.कृषी सहाय्यक काशीद एस.सी.सेवा सोसायटीचे चेअरमन दत्तात्रय पिनू नाईकवाडे,शेतकरी जीवनबप्पा जोगदंड, बाळासाहेब जोगदंड,आजूभाई मुजावर, सुदर्शन जोगदंड, पत्रकार अजमेर मणियार,पत्रकार मुस्तफा पठाण आदी उपस्थित होते.

इमामेक्टीन बेंझोएट ७.५ ग्रॅम प्रति

१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.व प्रोफेनोपेस २०मिली प्रतिदहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी जेणेकरुन अळ्या नष्ट होतील.इमामेक्टीन बेंझोएट ५०%अनुदान तत्वावर कृषी कार्यालय मध्ये उपलब्ध आहे. याचा शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आव्हान यांनी केले आहे.

-तालुका कृषी अधिकारी बाबासाहेब गंडे

आज अण्णाभाऊ साठे क्रीडांगण खंडेश्वरी बीड येथील लहान मुलांना क्रिकेट किट भेट दिली. यावेळी मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

आदित्य कृषी महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन सोहळा

आदित्य कृषी महाविद्यालय बीड येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला. व तसेच विद्यार्थ्यांना भविष्यात कृषी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदितीजी सुभाषचंद्रजी सारडा,(कार्यकारी सदस्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ) सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होत्या. व प्रमुख पाहुणे म्हणून आदित्य शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ अरुण मुंडे सर होते. या कार्यक्रमासाठी प्राचार्य श्याम भुतडा प्राचार्य डॉ सतीश कचरे, प्राचार्य डॉ लहू हिंगणे, प्राचार्य डॉ अमोल सानप प्राचार्य गरजे सर यांच्यासह आदित्य कृषी महाविद्यालयाचा इतर प्राध्यापक वर्ग प्रामुख्याने उपस्थित होता. स्नेहमिलनाची

सुरुवात सरस्वती पूजन करून दीप प्रज्वलनाने झाली. याप्रसंगी शासकीय, निमशासकीय, व तसेच खाजगी संस्थावर असणारी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी यांनी त्यांच्या कॉलेजमधील आठवणींना उजाळा दिला व तसेच त्यांच्या जीवनातील शिक्षणाचा खडतर प्रवास व त्यांनी गाठलेले यशाच शिखर याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यश गाठण्यासाठी अभ्यासाला कठोर परिश्रमाची जोड द्यावी व विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत सामाजिक मूल्य ही आत्मसात करावी असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ आदितीजी सुभाषचंद्रजी सारडा यांनी केले. विद्यार्थिनी स्वतःच्या उन्नतीसह समाजाच्या विकासाकडे लक्ष द्यावे असे प्रतिपादन डॉ अरुण मुंडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य डॉ संदीप मोरे, डॉ धनंजय सातपुते यांचे लाभले . कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचलन ओम कुरडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रदीप भोसले यांनी केले.

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय, कोंघारा येथील सातव्या सत्राचे ग्रामीण कृषी कार्यानुभव या कार्यक्रमा अंतर्गत दातपांडी येथील शेतकऱ्यांना फायदेशीर कीटक आणि हानिकारक कीटक या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये फायदेशीर कीटक कोणते व हानिकारक कीटक कोणते ? यांची ओळख शेतकऱ्यांना करून देण्यात आली. तसेच फायदेशीर किटकाचे महत्व व त्यांचे संगोपन कसे करावे तसेच हानिकारक कीटकाचे व्यवस्थापन कसे करावे याचे उपाय शेतकऱ्यांना सांगण्यात आले. शेतीत उत्तम बियाणे, सिंचन,खते आणि पीक संरक्षण या चार निविष्ठा महत्त्वाच्या आहेत. परंतु पाचवी म्हत्वाची निविष्ठा म्हणजे परागीभवन करणारे कीटक जगातील सुमारे ७० ते ८० टक्के पीक परपरागी सिंचनासाठी (लॉंगी श्रिंश्रळपरींळेप) कीटकांवर अवलंबून असतात. शेतीस फायदेशीर अशा कीटकांमध्ये (श्रिंश्रळपरींळपस ळपीशलॉंगी) भूंगेरा, मधमाशी, रेशीम किडा, लेस विंग,चतुर, हिरवा घोडा,चीत्रांग भुंगेरा,लाख कीटक यांचा समावेश होतो. तर हानिकारक अशा किटकांमधे मावा,ढेकूण,लाल मुंगी,भुंगा,झुरळ, रातकिडा, नाकतोडा, टोळ यांचा समावेश होतो.अशाप्रकारे कृषी महाविद्यालय कोंघारा येथील ठ-थए च्या विद्यार्थीनी रासेश्वरी जुमडे, वैष्णवी काळे, शर्वरी दासोडे, सृष्टि गायमुखे, वैष्णवी कोटकर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.तसेच कृषि महाविद्यालयाच्या प्राध्यापिका व कीटक विशेषज्ञ प्रा. वैष्णवी वाघ मॅडम यांनी सुद्धा शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ढोके मॅम,ठ-थए इन्चार्ज प्रा.संकेत येलोरे सर,कार्यक्रम अधिकारी प्रा.डि.आर.जाधव सर यांचे आम्हाला मार्गदर्शन लाभले.

नवकिरण फिल्म बीड जिल्हा पोलीस दल निर्मित लाडली बेटीया हा हिंदी चित्रपटाचा विशेष शो सुपरहिट

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, नवकिरण फिल्म टीम ची विशेष उपस्थिती

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील एका सामाजिक जटिल प्रश्नावर आधारित हिंदी चित्रपटाची निर्मिती करण्यात आली. बीड जिल्ह्यात मध्यंतरी काळात झालेल्या स्त्रीभ्रूण हत्या विरोधात जनजागृती करण्यासाठी बीड जिल्ह्याचेभूमिपुत्र बाबा जोगदंड यांनी लाडली बेटीया या हिंदी चित्रपटाची निर्मिती केली.नवकिरण फिल्म व पोलीस फाउंडेशन महाराष्ट्र च्या संयुक्त विद्यमाने या चित्रपट भारत व जगभर मुली महिलावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात जनजागृतीच्या माध्यमातून लाडली बेटीया हा हिंदी चित्रपट निर्मित झाला. भारत सरकारच्या बेटी बचाव बेटी पढाव या

अभियानांतर्गत या चित्रपटाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली आहे. हा चित्रपट भारत देशात महाराष्ट्रातून सर्वप्रथम बीड जिल्ह्यातील अधिकारी पदाधिकारी,प्रतिष्ठित वकील डॉक्टर, पत्रकार, सामाजिक, व बीड कर यांच्या उपस्थित संतोषी माता या चित्र मंदिरात दाखवण्यात आला. यावेळी बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,अप्पर पोलीस अधीक्षक सचीन पांडकर, नवा किरण फिल्म टीमचे सर्व सदस्य तसेच निर्माते दिग्दर्शक यांची प्रमुख उपस्थिती होती. बीड जिल्ह्यात झालेल्या स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात, महिलावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात, एका आईची मुलीला वाचवण्यासाठी केलेला संघर्ष, त्याच मुलीच्या बापाच देशप्रेम या चित्रपटात प्रामुख्याने दाखवण्यात. या चित्रपटाला बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे बीड जिल्हा पोलीस दलाचा हा चित्रपट सुपरहिट झाला. नव किरण फिल्म पोलीस फाउंडेशन महाराष्ट्र च्या वतीने चित्रपटासाठी येणाऱ्या विशेष मान्यवरांचे मुलींच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

सुरेखा सानप यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार

शिरूर (प्रतिनिधी)

तालुक्यातील कानिफनाथ वस्ती वारणी या शाळेवर कार्यरत असलेल्या सुरेखा सानप यांना मैत्रा फाऊंडेशनचा आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाला आहे.ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर साळेगावकर,जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख,सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड आणि राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक शशिकांत कूलथे यांच्या हस्ते समाज कल्याणच्या सभागृहात रविवारी या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.मैत्रा फाउंडेशनच्या वतीने कला,साहित्य,शैक्षणीक आणि सामाजिक कार्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना

राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.मैत्रा फाउंडेशनचे द.ल.वारे यांच्या संकल्पनेतून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असून राज्यातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिभावंत व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.सुरेखा सानप यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे

पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत परळीत श्रीराम कथेचा उत्साहात समारोप

पंकजाताईंचा साधेपणा ; भाविकांत बसून केले कथा श्रवण

परळी (प्रतिनिधी)

चैतन्य गोशाळा ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेचा समारोप भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्यासह हजारो भाविक भक्तांच्या साक्षीने आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पंकजाताईंनी भाविकांत बसून कथा श्रवणाचा लाभ घेतल्याने त्यांचा साधेपणा फुन्हा एकदा दिसून आला.

पुणे येथील चैतन्य गोशाळा ट्रस्टच्या वतीने श्री वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी २ डिसेंबर पासून श्री रामकथेचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा समारोप आज झाला. राम कथा निरूपणकार श्री रविंद्र

पाठक यांच्या सुश्राव्य आणि संगीतमय रामकथा श्रवणाचा हजारो भाविक भक्तांनी यावेळी लाभ घेतला. आजच्या समारोपाला भाजप नेत्या पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या, त्यांनी भाविकांत बसून कथा श्रवण केले, कथा समाप्तीनंतर त्यांच्या हस्ते आरतीही करण्यात आली, यावेळी निरूपणकार पाठक यांनी त्यांचा आशीर्वाद रूपी सत्कार केला. यावेळी मनोगत व्यक्त करताना पंकजाताईंनी श्रीरामकथा ही परळीकरांसाठी मोठी पर्वणी ठरल्याचे सांगत पाठक यांच्या अमोघ वाणीचे मनापासून कौतुक केले. मर्यादा पुरूषोत्तम श्री प्रभू रामचंद्रांचा आदर्श प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारण्याची आज गरज आहे असे प्रतिपादन केले. भाजपचे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख, तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सुचिता पोखरकर, नितीन समशेट्टे, प्रितेश तोतला, आश्विन मोगरकर आदी यावेळी उपस्थित होते.

रविंद्र पाठक यांचा यशःश्रीवर सत्कार

श्रीराम कथा निरूपणकार रविंद्र पाठक यांनी दुपारी यशःश्री निवासस्थानी भेट दिली. यावेळी प्रज्ञाताई मुंडे, पंकजाताई मुंडे व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांनी पाठक यांचा सपत्नीक कौटुंबिक सत्कार केला. श्रीराम कथेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल भाविकांच्या वतीने पंकजाताईंनी त्यांचे आभार मानले.

उपोषणार्थी अर्जुन खाडे यांची नागपूर येथे प्रकृती बिघडली

बीड/ नागपूर प्रतिनिधी

उपोषणार्थी अर्जुन खाडे मौजे कानडी ता. केज यांचे नागपूर हिवाळी अधिवेशनावर गावातील हल्लेखोरावर पोलीस प्रशासनाने ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी यशवंत स्टेडियम येथे अमरण उपोषण चालू आहे. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांच्यावर यशवंत स्टेडियम येथील उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिकेतून उपचार देण्यात आले. उपोषणार्थी खाडे म्हणाले जोपर्यंत ट्रॉसिटी अंतर्गत पुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही या भूमिकेवर ठाम आहेत.

वंचित बहुजन आघाडी मध्ये इनकमिंग सुरू - शैलेश कांबळे

अंबाजोगाई शहरात अनेक मुस्लिम युवकांचा वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ऍड बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा अध्यक्ष शैलेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली अंबाजोगाई शहरातील मुस्लिम सामाजीक कार्यकर्ते शेख रशीद भाई आणि अब्दुल रहीम भाई, तसेच रिपब्लिक महाराष्ट्र न्युज चॅनल चे संपादक विराज धिमधिमे, भा.ज.प. बीड जिल्हा कामगार अध्यक्ष दीपक गोरे यांच्या सह वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई शहर मधील सदर बाजार, क्रांती नगर लाल नगर, संघर्ष नगर येथील शेकडो कार्यकर्ते यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश केला. या वेळेस वंचित बहुजन आघाडीचे उपअध्यक्ष धम्मा कासारे, जिल्हा उपअध्यक्ष अमोल पौळे, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख रवि शिरसाट,शहर अध्यक्ष गोविंद मस्के, व अंबाजोगाई शहरातील जिल्हा तालुका, शहर, युवक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज अंबाजोगाई येथील सोमवंशी आर्य क्षत्रिय गाडीलोहार समाज स्मशनभूमी येथे कार्यसम्राट लोकप्रिय आमदार सौ नमिता ताई अक्षय मुंदडा यांच्या स्थानिक विकास निधी कार्यक्रमा अंतर्गत आमदार निधीतून करन्यात येत असलेल्या कामाचा शुभारंभ आमदार सौ नमिता ताई अक्षय मुंदडा जेष्ठ नेते मा श्री नंदकिशोर काकाजी मुंदडा, यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते मा श्री अक्षय भैय्या मुंदडा यांच्या हस्ते व समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कामाचा शुभारंभ करण्यात आला.

लिंबागणेश (प्रतिनिधी)

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण द्यावे या मागणीसाठी मराठा योद्धा मनोजजी जरांगे पाटील यांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी बीड तालुक्यातील मुळूकवाडी येथील ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले असुन आज उपोषणाचा नववा दिवस आहे.आज सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दिला. यावेळी सुरज ढास, सुरेश ढास,चिंतामण ढास, पांडुरंग कानडे, दादासाहेब ढास,संदिप ढास, कृष्णा पितळे,केशव ढास,केशव रंधवे, लक्ष्मण ढास, अवधुत ढास, प्रविण ढास,बाळु जगताप, अशोक ढास,मल्हारी ढास, ऋषिकेश ढास, ईश्वर ढास, अमोल ढास, रामहरी ढास,बाळु ढास,बंडु ढास, ज्ञानेश्वर ढास, शेषेराव आदि उपस्थित होते.

युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी चौसाळा येथील विवेक कुचेकर यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील चौसाळा शहर हे सध्या प्रत्येक विषयात चर्चेत असुन शहरातील युवक प्रत्येक क्षेत्रात आपल व आपल्या शहराचे नावलौकिक करत आहेत तसेच येथिल रहीवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार विवेक कुचेकर हे आपल्या शहरातील व परिसरातील प्रत्येक प्रश्नाकडे त्यांचे बारीक लक्ष असते

शहराचे व परिसराचे नाव मोठे होण्यापेक्षा शहर व परिसर मोठे व्हावे मग नाव आपोआप मोठे होते या तत्तवावर चालणारे ग्रामीण क्षेत्रासी नाळ जोडलेली असल्यामुळे सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे म्हणुन त्यांची चौसाळा व परिसरात ओळख आहे त्यांच्या कार्याची दखल घेवुन युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा, गणेश कचकलवार यांनी त्यांच्या सामाजिक व निर्भिड पत्रकारिता या कार्याची दखल घेवुन त्यांना युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र देवुन निवड केली आहे

यावेळी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, गोरगरीब,शेतकरी,कष्टकरी, शोषित,पिडीतांच्या अन्यायला वाचा फोडण्यासाठी तसेच पत्रकारांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्यासाठी हि संघटना संपुर्ण राज्यात कामे करत आहे अशीच कामे नवनिवार्चित बीड जिल्हाउपाध्यक्ष विवेक कुचेकर यांनी संघटनेच्या माध्यमातुन करावीत पुढील कार्यास शुभेच्छा देवुन नियुक्तीपत्र देण्यात आले विवेक कुचेकर यांची निवड झाल्याची कळताच त्यांच्या मित्र परिवाराकडुंन त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT